# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/12/2023 (मंगळवार) सकाळ

## जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापा :– अंतर्गत ०७ किमी अंतरावर मौजा पौनिकर यांचे शेतात रामडोंगरी सावनेर येथे दिनांक १७/१२/२०२३ ते दिनांक १८/१२/२०२३ चे २०.०० वा. ०६.०० वा. दरम्यान यातील मृतक नामे– **सूलकाबाई चाचेरे, वय ८० वर्ष, रा. चोपा, ता गोरेगाव जि. गोंदिया ह. मु. पौनिकर यांचे शेतात, रामडोंगरी ता. सावनेर** हिचे महिला आरोपी (मृतकाची सुन) हिचे सोबत झालेल्या भांडणाचे कारणावरून मृतक हिचा नातू आरोपी क्र. १) मुन्नालाल किसन चाचेरे वय २३ वर्ष याने मृतक हिला दगडाने डोक्यावर मारून ठार मारले व महिला आरोपी सुनेने मृतकास लाकडी दांडयाने मारले व आरोपी क्र. ०१) व मृतक हिचा मुलगा आरोपी क्र. २) नामे–किसन जोंधरू चाचेरे, वय ५० वर्ष तिन्ही रा. चोपा, ता. गोरेगाव जि. गोंदिया ह. मु. पौनिकर यांचे शेतात, रामडोंगरी ता. सावनेर यांनी संगणमत करून मृतक हीची डेड बॉडी प्लॅस्टीकच्या थैलीमध्ये भरून पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने जवळच असलेल्या रामडोंगरी परीसरातील पहाडी भागात फेकून दिले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०२, २०१, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी क्र. २) याला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि मनोज खडसे, पो.स्टे. खापा मो. नं. ९४२१०५०३७० हे करीत आहे.

## लोखंडी एंगल चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत मौजा लाडगाव शिवार येथे फिर्यादी नामे– प्रविण सुर्यभानजी लव्हाळे, वय ५८ वर्ष, रा. धोटे प्लॉट काटोल हा दिनांक १६/१२/२०२३ रोजी सायंकाळी ०४/०० वा. दरम्यान फिर्यादी हा घरी हजर असता श्री. रूपेश धुंदे याने फोन करून सांगीतले कि, तुमचे शेतीचे कंपाउडचे लोखंडी एंगल चोरी गेलेले आहे. फिर्यादीने आपले शेतात जावुन पाहिले असता शेतातील लोखंडी एंगल व तारेच्या कंपाउंडचे १० एंगल किंमती ५०००/– रू. चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक दिनेश वरठे मो. नं. ७०३८४४५७८२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर